स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

<u>शोधप्रबंधाचा प्रारंभिक आराखडा</u>

कॉम्रेड शरद पाटील यांच्या राजकीय व सामाजिक विचारांचा चिकित्सक अभ्यास

मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पी.एच.डी) पदवीसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यास सादर करावयाचा शोधप्रबंधाचा प्रारंभिक आराखडा

: संशोधक :

भारत डिगांबर पवार

: मार्गदर्शक :

प्रा.डॉ.फुके व्ही.एल.

राज्यशास्त्र विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापिका

श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

: संशोधन केंद्र :

पीपल्स कॉलेज, नांदेड

डिसेंबर २०२४

कॉम्रेड शरद पाटील यांच्या राजकीय व सामाजिक विचारांचा चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना :

आधुनिक भारतामध्ये ज्या राजकीय व सामाजिक चळवळी उभ्या राहिल्या त्यामध्ये कम्युनिस्ट चळवळीतले एक महत्वपूर्ण नाव म्हणजे कॉम्रेड शरद पाटील होय. त्यांनी सत्यशोधक चळवळीचा वारसा घेऊन ऐन तारुण्यात कॉम्रेड शरद पाटील. कम्युनिस्ट पक्षात भाग घेतला आणि धुळे, नंदुरबार, खानदेशात आदिवासींचे लढे उभे केले. आदिवासींसाठी जमीन अधि ग्रहणाचा कायदा करण्याचे काम कॉम्रेड शरद पाटील यांनी केले आहे सामाजिक दबाव गटात त्यांचा मोठा हिस्सा आहे. कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करून महाराष्ट्रात नवीन राजकीय प्रयोग केला.

जातीअंताच्या मुद्याला प्राधान्येत महत्त्वाचे स्थान देत महाराष्ट्राच्या राजकारणात एक मोठा दबाव गट निर्माण केला. औरंगाबाद आत्ताचे संभाजीनगर नामांतराच्या लढ्यात २००० आदिवासी समाजांच्या लोकांचा मोर्चा छत्रपती संभाजी नगर कडे आणला होता तसेच त्यांच्या मूळ गावी गावातील प्रस्थापित राजकीय नेत्यांच्या विरोधात देखील त्यांनी लढा उभा केला होता. तसेच कॉम्रेड शरद पाटील यांनी छटाक भर साखरेचा संघर्ष हा त्याकाळी फार चर्चेत राहिलेला संघर्ष म्हणून ओळखला जातो. अंगभर पुरेशी वस्त्र नसणाऱ्या तथा ताटामध्ये भाकरी बरोबर चटणी खाणाऱ्या आदिवासी समुदायाला हक्काची घरे मिळवून देण्यात शरद पाटील यांचे मोठे योगदान आहे. स्वतःची बैलजोडी व बैलगाडी बरोबरच वर्षभर खायला लागेल एवढे अन्नधान्याच्या राशी मिळवून देण्याचे काम हे कॉम्रेड शरद पाटलांनी केल्याचे दिसून येते हे करताना त्यांनी तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात फार मोठे संशोधन उभे केले.

मार्क्सवादाच्या मर्यादा दाखवत मार्क्सवाद्यांना कृती कार्यक्रम बदलण्यासाठी भाग पाडल्याचे दिसते आणि आणि भारतीय परी प्रेक्षातील नव्या तत्त्वज्ञानाची निर्मिती केली आदिवासी वाड्या, वस्त्या, तांड्यावर संघर्ष करत साधे जीवन जगल्याचे दिसून येते.

कॉम्रेड शरद पाटील यांच्या जीवनावर तसेच कार्यावर प्रकाश टाकण्याअगोदर त्यांच्या बालपणावर प्रकाश टाकूयात कॉम्रेड शरद पाटील यांचा जन्म धुळे जिल्ह्यात कापडणे या गावी १७ सप्टेंबर १९२५ रोजी झाला त्यांचे वडील तानाजी तुकाराम पाटील व आई मंदोदरी या दांपत्याच्या पोटी झाला. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण हे धुळे या ठिकाणीच झाले. त्यांना घरातच सत्यशोधकी व वारकरी चळवळीची आवड निर्माण झाली. धुळयात शाळेत शिकायला असताना त्यांना अभ्यासू व शिस्तप्रिय शिक्षक लाभल्यामुळे बालवयातच त्यांना सामाजिक बांधिलकी व ध्येयवादाच्या प्रेरणा मिळाल्या त्यांना चित्रकलेच्या आवडी बरोबरच त्यांना अवांतर वाचनाची सवय होती. त्यामुळे त्यांना बडोद्याच्या एका पेंटिंग कालभवनात शिक्षणासाठी पाठवले. त्यानंतर ते मुंबई येथील सर जेजे स्कूल ऑफ आर्ट मध्ये त्यांनी प्रवेश घेतला तेथे तिसऱ्या वर्षाला शिकत असताना राज्यव्यापी विद्यार्थी संपात सहभाग घेतल्यामुळे काही समस्या निर्माण झाल्या व त्यांना तिथून अर्धवट शिक्षण सोडून धुळयाला परत यावे लागले व तेथून परत आल्यावर त्यांचा परिचय कम्युनिस्ट विचारसरणीच्या कार्यकर्ते व प्रचारकांशी झाला. त्यामध्ये गव्हाणकर, अमर शेख व अण्णाभाऊ साठे या शाहिरांच्या संपर्कातून ते कम्युनिस्ट पक्षात दाखल झाले. त्यांची चित्रकलेची आवड पाहून त्यांना पक्षाच्या मुंबई कार्यालयात आर्टिस्ट म्हणून काम दिले.

वर्षभरानंतर धुळयात परत आल्यावर त्यांनी गिरणी कामगार चळवळीचे काम करू लागले. तसेच त्यांनी गोवा मुक्ती आंदोलन, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ यात सक्रिय सहभाग घेतला. १९६३ ते १९६५ या तीन वर्षाच्या काळात त्यांनी कार्ल मार्क्सचा दास कॅपिटल हा ग्रंथ समजून घेतला. पक्षाने त्यांना जातीव्यवस्थे विरोधात काम करायला विरोध केल्यामुळे पक्षात संघर्ष वाढत गेला. अखेर त्यांनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा पदाचा राजीनामा देऊन आपल्या इतर सहकाऱ्यांसोबत मार्क्सवाद, फुले, आंबेडकरवाद (मा.फु.आ.) या विचारसरणीवर आधारित सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची (सकप) स्थापना केली. सकपची चळवळ वैचारिक भूमिका घेऊन लढत होती.

भारतातील शासन व्यवस्था ही शोषण करणारी शासन व्यवस्था असल्याचे कॉम्रेड शरद पाटील यांचे हे मत राहिले आहे. भारतात सरंजामी जातीव्यवस्था नष्ट झालेली नसल्यामुळे सौंदर्यशास्त्र जन्माला येणे शक्य नव्हते परंतु सातव्या शतकात जातीव्यवस्था करमट होत गेल्यामुळे तत्त्वज्ञान व सौंदर्यशास्त्र जन्माला येणे शक्य नव्हते परंतु बुद्धाने केलेल्या वर्ण दास अंतक समाज क्रांती नंतर उदयोन्मुख भांडवलदार व कारागीर यांच्यात होणे गरजेचे आहे. पश्चिमेत सिग्मंड फ्राईड यांच्या व त्याच्या प्रमाणशास्त्राचा विकास केला त्यांनी जगभरातील कला, साहित्य तत्त्वज्ञान सामाजिक विचार प्रवाहांचा अभ्यास केला आणि भारताच्या इतिहासाच्या मांडणीत मातृसत्ताक, स्त्रीसत्ताक या समाजव्यवस्थेच्या कालखंडापासून आधुनिक लोकशाहीपर्यंत एक नव्या मूल्यमापनासह सांस्कृतिक व राजकीय मांडणी केली आहे. त्यांनी केलेली ही मांडणी देशाला दिलेले एक महत्वपूर्ण योगदान असल्याचे भारतातील लेखक, साहित्यिकांनी मान्य केले आहे. कॉम्रेड शरद पाटील हे अतिशय बुद्धिमान व प्राच्यविद्यापंडित म्हणून आज ते परिचित आहेत स्वातंत्र्य भारताच्या पटलावर जे महान विद्वान होऊन गेले त्यामध्ये महात्मा ज्योतिराव फुले, विठ्ठल रामजी शिंदे, धोंडो केशव कर्वे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कर्मवीर भाऊराव पाटील, धर्मानंद कोसंबी यांच्या जोडीला कॉम्रेड शरद पाटील यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. अशा या महान विचारवंताचा मृत्यू आजारी असताना मेंदूतील रक्तस्त्रावामुळे वयाच्या ८९ व्या वर्षी १२ एप्रिल २०१४ रोजी धुळे या ठिकाणी झाला.

संशोधन समस्या :

समस्या ही संशोधनाची जननी असते. समस्येशिवाय संशोधनाचा विचारच मुळात असू शकत नाही. खरंतर संशोधन समस्या हा संशोधनातील महत्त्वाचा गाभा आहे. कॉम्रेड शरद पाटील यांचे राजकीय व सामाजिक विचार धुळे नंदुरबार खानदेश व संपूर्ण महाराष्ट्रात महत्वपूर्ण असल्याचे आपण पाहणार आहोत. तसेच कॉम्रेड शरद पाटलांची कार्य

आदिवासींसाठी लढे मोर्चे भूमी अधिग्रहणाचा कायदा जाती व्यवस्थेच्या विरोधात काम या त्यांच्या कार्याचे संशोधन करणार आहोत.

विषय निवडीचे महत्त्व किंवा आवश्यकता :

प्रस्तुत संशोधनात कॉम्रेड शरद पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सखोल अभ्यास करून मते मांडली जाणार आहेत. कॉम्रेड शरद पाटील यांचे कार्य हे लोकशाहीवादी व सामाजिक समता आणण्यासाठी महत्वपूर्ण मानले जातात. आजच्या परिस्थितीत भारताच्या आणि महाराष्ट्राच्या राजकारणात जात आणि धर्म हा मुद्दा केंद्रबिंदू झाल्याचे दिसून येते याचसाठी कॉम्रेड शरद पाटील यांचे जातीव्यवस्थेविरोधातील कार्य हेच संशोधन विषयात मांडणार आहोत.

संशोधन विषयाचे महत्त्व :

आजच्या परिस्थितीत संविधानिक लोकशाहीत जात हा मुद्दा चर्चेचा बनला आहे देशाचे संपूर्ण राजकारण जातीच्या मुद्द्यांना केंद्रबिंदू करून होत आहे अशा वेळेला कॉम्रेड शरद पाटील यांच्या साहित्याच्या अध्ययना आधारे जातीसारखे गंभीर प्रश्न निश्चितच सोडवता येतील. भारतीय समाजव्यवस्था टोळी समाजाकडून वंश समाजाकडे, वंश समाजाकडून, वर्ण समाजाकडे, वर्ण समाजाकडून जात आणि वर्ग समाजाकडे मार्गक्रमण करत आल्याची मांडणी कॉम्रेड शरद पाटील यांनी केली आहे. आजच्या समस्यांची उत्तरे मातृसत्ताक स्त्री सत्ताक समाज व्यवस्थेच्या कालखंडातील ना जात ना वर्ग समाज व्यवस्थेत शोधता येतील असा शरद पाटील यांच्या मांडणीचा एक सूर आहे.

भारतीय प्रस्थापित शोषण शासनाचे विविध स्तर शरद पाटील लक्षात आणून देतात. तुर्कपूर्व सामंत प्रथाक कालखंडात खालून सामंत प्रथा व वरून सामंतप्रथा यात बड्या राजे महाराजांपासून ते गाव पातळीवरील छोट्या प्रस्थापितांच्या शोषण शासनावर बारकाव्याने लक्ष देतात. कोणत्या राजवटीत भारतीय समाजव्यवस्था रसातळाला गेली होती याचे देखील कॉम्रेड शरद पाटील यांनी गांभीर्याने मांडणी केली आहे. हे त्यांचे संशोधनाचे योगदान आज

आपल्याला टाळून चालता येणार नाही त्याचबरोबर बेदखल केलेल्या शासन संस्था कालखंडाच्या क्रमवारीत लावून शरद पाटील सूत्रबद्ध करतात. अराज्यक आणि राज्य संघटन समाज व्यवस्थेच्या काळातील उत्पादन वाढीच्या समाज क्रांतीवर शरद पाटलांनी दिलेले योगदान अतुलनीय आहे भारतीय समाजक्रांतीच्या क्रमात उत्पादन वाढ हा केंद्रस्थानी असलेला मुद्दा शरद पाटील लक्षात आणून देतात. प्रत्येक कालखंडाचा ते उत्पादन साधने सबंध याद्वारे राजकीय सामाजिक धुंडोळा घेतात ज्याद्वारे त्यांचे हे संशोधन अधिक सुसंगत व सत्याच्या जवळ जाणारे ठरले आहे येणाऱ्या काळात आजच्या सामाजिक व राजकीय समस्या सोडविण्यासाठी हे निश्चितच उपयोगाला येणारे आहे. भारतासारख्या महाबलाढ्य देशात संपत्तीचे विकेंद्रीकरण झाले आहे आणि मूठभर लोकांच्या हातात देशाची साधन संपत्ती गेली आहे. अशा वेळेला शरद पाटील हे शेत जमिनीच्या समसमान वाटपाचा कृती कार्यक्रम सांप्रत राज्याकडे ठेवतात आणि जाती अंताचा कायदाच व्हावा अशी त्यांची मागणी आहे. या प्रकारचे त्यांचे कृती कार्यक्रम निश्चित देशाला आणि राजकारणाला विधायक वळणे देणारे आहेत आणि फार मोठ्या समस्या सोडवणारे आहे. सामाजिक सुधारणेच्या क्रमात आदिवासी समाजाच्या विकासाचा प्रथम प्राधान्यक्रम लक्षात आणून देतात व खालून वर विकास होत जावा आदिवासी समाजाला आरोग्य, शिक्षण, सामाजिक व प्राथमिक गरजांच्या प्रवाहात आणण्यासाठी शरद पाटील यांनी संघर्ष केल्याचे आढळून येते.

कॉम्रेड शरद पाटील यांनी स्त्रियांच्या प्रश्नांवर व मुक्तीवर फार संवेदनशील असे कार्य केले आहे भारताच्या प्रगतीत स्त्रियांच्या सामाजिक आर्थिक, राजकीय विकास यामधील अडथळा असल्याचे त्यांनी सांगितले आहे. नजुबाई गावित या आदिवासी कादंबरीकार आहेत याचे श्रेय कॉम्रेड शरद पाटील यांना जाते.

अशाप्रकारे स्त्रियांच्या न्याय हक्कासाठी लढणारा कृतीशील विचारवंत म्हणून कॉम्रेड शरद पाटील यांच्याकडे पहावे लागते सामाजिक बदलातून राजकीय बदल होत असतात त्यामुळे कॉम्रेड शरद पाटील यांच्या समाज बदलाच्या कार्याकडे गांभीर्याने पहावे लागते.

संशोधनाचे उद्दिष्ट्ये :

१) कॉम्रेड शरद पाटील यांच्या राजकीय व सामाजिक विचारांचा अभ्यास करणे.

२) कॉम्रेड शरद पाटील यांनी मार्क्सवादी विचारात, परंपरेत टाकलेल्या वैचारिक योगदानाचा अभ्यास करणे.

३) कॉम्रेड शरद पाटील यांच्या सामाजिक विषमता व वर्ग संघर्षाच्या विचारांचे चिकित्सक अध्ययन करणे.

४) कॉम्रेड शरद पाटील यांनी मांडलेल्या समाजावादाबद्दलच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

५) कॉम्रेड शरद पाटील यांनी उभारलेल्या कम्युनिस्ट चळवळीचा महाराष्ट्राच्या राजकारणावर पडलेला प्रभाव अभ्यासणे.

६) कॉम्रेड शरद पाटील यांचा सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची भूमिका व योगदान अभ्यासणे.

७) शरद पाटील यांचा सामाजिक विचारांची आजच्या काळातील प्रस्तुतता अभ्यासणे.

संशोधनाची गृहितके :

१) कॉम्रेड शरद पाटील यांच्या राजकीय व सामाजिक विचारांचे महाराष्ट्राच्या वैचारिक जडणघडणीत महत्त्वाचे योगदान आहे.

२) कॉम्रेड शरद पाटील यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षामुळे समतावादी विचार रुजण्यास मदत झाली.

३) आदिवासी दलित व स्त्री अशा उपेक्षित समुदायांच्या हक्कांसाठी कॉम्रेड शहर पाटील यांनी दिलेला लढा या समुदायाच्या उन्नतीस सहाय्यभूत ठरला.

४) जात वर्ग आणि लिंगभेद समुळ नष्ट करण्यासाठी आणि सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्यासाठी कॉम्रेड शरद पाटील यांचे विचार व कार्य मौलिक ठरले.

५) मार्क्सवादी तत्त्वज्ञानाची सांगड आंबेडकरवादी व फुलेवादी विचारसरणीची घालून कॉम्रेड शरद पाटील यांनी सौत्रांतिक मार्क्सवादी ही संकल्पना विकसित केली.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधन हे सामाजिक शास्त्र विद्या शाखेंतर्गत राज्यशास्त्र या विषयात करण्यात येणार आहे. संशोधनाचे स्वरूप, संशोधनाचा उद्देश आणि संशोधकाचा दृष्टिकोन या आधारावर संशोधन कार्याच्या पद्धती ठरविण्यात येते. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी गुणात्मक, विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांच्या आधारावर मिळालेल्या माहितीच्या आधारावर संशोधनाचे कार्य पूर्ण करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन :

संशोधन कार्यासाठी आवश्यक असलेल्या माहितीस तथ्य असे म्हणतात. तथ्य संकलनाचे प्राथमिक व दुय्यम असे स्त्रोत असतात. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी प्राथमिक दुय्यम तथ्य संकलनाच्या साधनांचा वापर करण्यात येणार आहे प्राथमिक घटकांमध्ये मुलाखत, अनुसूची सारख्या साधनांचा वापर करण्यात येणार आहे. तसेच दुय्यम साधनांमध्ये त्यांच्यावर लिहिलेल्या ग्रंथांचा तसेच समकालीन लेखकांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत.

संशोधन विषयाच्या मर्यादा :

१) कॉम्रेड शरद पाटील यांच्या समग्र साहित्याचा आणि मांडणीचा अभ्यास करणे त्याची सध्याच्या समस्यांशी अन्वयार्थ लावणे महत्त्वाचे आहे परंतु आपल्या संशोधन क्षेत्राच्या कार्यक्षेत्रात राजकीय व सामाजिक विचारांचा अभ्यास करणे निश्चित केले आहे.

२) कॉम्रेड शरद पाटील यांचा कम्युनिस्ट पक्षांच्या चळवळी पडलेला प्रभाव अभ्यासताना ठराविक मुलाखतीचा आढावा घेतल्यामुळे हे होणारे संशोधन एका मर्यादित चौकटीत आहे.

३) कॉम्रेड शरद पाटील यांना जाऊन दहा वर्षे झाली आहेत. ती गेल्यानंतर पहिल्यांदा त्यांच्या राजकीय विचारांवर संशोधन होत आहे त्यामुळे यात काम करणे गुंतागुंतीचे आहे.

४) या संशोधनात विविध मुलाखती कॉम्रेड पटेल यांचे ग्रंथ तसेच काही स्थळांना भेटी, मासिके, साप्ताहिकांचा अभ्यास या संबंधात अध्ययन करून संशोधन मानले आहे. यादवराचे संशोधन केलेले आहे.

५) अनेक मार्क्सवादी लेखक, साहित्यिक, महा पंडितांच्यातून कॉम्रेड शरद पाटील या एकाच व्यक्तीच्या राजकीय, सामाजिक विचारांवर हे संशोधन आधारलेले आहे व्यक्ती केंद्रितता ही या संशोधनाची मर्यादा आहे.

संशोधनाचा आराखडा :

संशोधन आराखडा म्हणजे अशी योजना की जिच्याद्वारे संशोधक समस्या सूत्रीकरणापासून ते संशोधन अहवालाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंतची रूप रेषा मांडतो संशोधन आराखडा हा संशोधनाची एक दिशा प्रस्तुत करत असतो. यामध्ये खालील प्रकरणे असतील.

प्रकरण पहिले - प्रस्तावना :

आधुनिक भारतातील विविध पक्ष चळवळींचा आढावा घेणारी अनेक साहित्यिक, लेखक मंडळी सध्याला कार्यरत आहे. कम्युनिस्ट चळवळीचे लेखन आणि पुनर्लेखन सातत्याने चालू असते याच धर्तीवर कॉम्रेड शरद पाटील यांचे राजकीय व सामाजिक विचारांचा प्रभाव या अनुषंगाने संशोधन करण्याचे कार्य हाती घेतली आहे. या अभ्यास विषयाचे उद्दिष्टे, विषयाची मांडणी, विषयाच्या मर्यादा आणि प्रभाव यावर प्रस्तुत प्रकरणांमध्ये मांडणी केली जाणार आहे.

प्रकरण दुसरे - कॉम्रेड शरद पाटील यांचे जीवन परिचय व कार्य :

या प्रकरणांमध्ये कॉम्रेड शरद पाटील यांचे जीवन चरित्र आणि त्यांनी केलेले कार्य यावर विस्ताराने चर्चा केली त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाची काही प्रसंग देखील संशोधनात

जाणार घेतले आहेत. त्याचबरोबर कॉम्रेड शरद पाटील यांचा मार्क्सवादी अभ्यास संशोधनासाठी घेतला जाणार आहे. त्यांनी सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेपासूनची पूर्ण माहिती देखील या प्रकरणात घेतली आहे.

प्रकरण तिसरे - कॉम्रेड शरद पाटील यांचे मार्क्सवादी विचार चिंतन :

या प्रकरणांमध्ये सुरुवातीला मार्क्सवाद व त्या संदर्भातील चर्चा केली आहे आणि कॉम्रेड शरद पाटील यांचे मार्क्सवादावरील विचार स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर कॉम्रेड शरद पाटील यांची मार्सवादाबद्दलचे मतभेद आणि त्यांच्या नव्या भूमिका मांडल्या आहेत. भारतीय परिप्रेक्ष्यात मार्क्सवाद जशाला तसा लागू होऊ शकत नाही. अशी मांडणी कॉम्रेड शरद पाटील यांची आहे. जातीयंत झाल्याशिवाय येथे भांडवली लोकशाही वर्गअंताची क्रांती होणार नाही असा कॉम्रेड शरद पाटील यांच्या मांडणीचा सूर आहे.

प्रकरण चौथे - कॉम्रेड शरद पाटील यांचे समाजवादा संदर्भाततील विचार :

पाश्चिमात्य समाजवादाबद्दल व युरोपियन समाजवादाबद्दल कॉम्रेड शरद पाटील यांनी विचार मांडले आहेत. क्युबन राज्यक्रांती बद्दल आणि समाजवादी क्रांती बद्दल कॉम्रेड शरद पाटील यांनी विचार मांडले आहेत. जाती अंतक भांडवली लोकशाही आणि तिची पूर्ती या कॉम्रेड शरद पाटील यांच्या ग्रंथावर चर्चा केली आहे. आणि आधुनिक समाजवादाबद्दलचे विचार मांडले आहेत. कम्युनिस्ट चळवळीतील विविध छोट्या पक्षांना एकत्रित करून एक समाजवादाबद्दलचे आदर्श मॉडेल कॉम्रेड शरद पाटील यांना उभे करायचे होते या प्रकारचे त्यांनी कृती कार्यक्रम आखला होता त्यांच्या या कार्याची चर्चा या प्रकरणात केली आहे.

प्रकरण पाचवे - महाराष्ट्राच्या कम्युनिस्ट राजकारणावर कॉम्रेड शरद पाटील यांचा प्रभाव :

या प्रकरणात महाराष्ट्राच्या कम्युनिस्ट चळवळीत कॉम्रेड शरद पाटील यांनी केलेला वैचारिक संघर्ष मानला आहे. त्यानंतर कम्युनिस्ट चळवळीचा प्राधान्यक्रम चुकल्यामुळे त्याची झालेली वाहतात चर्चेला घेऊन त्यावरून कॉम्रेड शरद पाटलांचा प्रभाव मांडला आहे.

त्यासाठी विविध मुलाखती घेऊन धुळे, नंदुरबार या आदिवासी भागात जाऊन सर्वे करून प्रकरणाची मांडणी केली आहे. महाराष्ट्रातील विविध कम्युनिस्ट पक्षांचे लोक कॉम्रेड शरद पाटील यांच्या संदर्भात काय भूमिका घेतात आणि त्यांच्यावर कॉम्रेड शरद पाटील यांचा काय प्रभाव आहे या प्रकरणात घेतला आहे.

प्रकरण सहावे - निष्कर्ष :

महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर कॉम्रेड शरद पाटील यांचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दिशादर्शक ठरले आहे. कम्युनिस्ट पक्ष चळवळीला एक नवा आयाम त्यांनी बहाल केला आहे. भविष्यातील जात वर्ग स्त्री दाशांत समाजवादी लोकशाही क्रांतीसाठी खऱ्या अर्थाने पायाभूत सुविधा उभ्या केल्या आहेत हे त्यांचे योगदान भारतासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. त्यांच्या या कार्यामुळे भविष्यातील राजकारण आणि समाजकारण अपार बदलून जाणार आहे हा निष्कर्ष त्यांच्या एकूण अभ्यासाच्या मांडणीतून केला जाणार आहे.

संदर्भग्रंथ सूची :

१) पाटील शरद तानाजी, दास शुद्राची गुलामगिरी, १९८२ मावळाई प्रकाशन पुणे.

२) पाटील शरद तानाजी, रामायण महाभारतातील वर्ण संघर्ष मावळाई प्रकाशन पुणे.

३) पाटील शरद तानाजी जात्यंतक भांडवलदारी लोकशाही क्रांती व तिची समाजपुर्ती (मराठी, इंग्रजी) मावळाई प्रकाशन पुणे.

४) पाटील शरद तानाजी प्रीमिटीव कम्युनिजम मातृसत्ता स्त्री सत्ता आणि भारतीय समाजवाद(इंग्रजी, मराठी) मावळाई प्रकाशन पुणे.

५) पाटील शरद तानाजी, बुद्ध भारतीय इतिहासातील लोकशाही, स्वातंत्र्य व समतेचा अग्निस्त्रोत मावळाई प्रकाशन पुणे.

६) पाटील शरद तानाजी, दास शुद्रांची गुलामगिरी खंड २, मावळई प्रकाशन पुणे.

७) पाटील शरद तानाजी, वर्ण जाती व वर्ण संघर्ष, मावळाई प्रकाशन पुणे.

८) कोसंबी दामोदर धर्मानंद, प्राचीन भारत की संस्कृति और सभ्यता, राजकमल प्रकाशन.

९) कोसंबी दामोदर धर्मानंद, भारतीय इतिहासाचा अभ्यास, जेनेरिक प्रकाशन.

१०) शर्मा रामशरण, भारत का प्राचीन इतिहास, ओ यु पी इंडिया २०१८.

११) थापर रोमिला, भारताचा इतिहास खंड दोन, पेंग्विन प्रकाशन इंडिया.

१२) थापर रोमिला, अशोक मौर्य, आर्यविग्टन प्रकाशन.

१३) कार्ल मार्क्स, दास कॅपिटल.

१४) कार्मार्क्स,द कम्युनिस्ट मेनी फेस्ट.

१५) शिवाजी कोण होता, कॉम्रेड गोविंद पानसरे

१६) दास शुद्राची गुलामगिरी खंड ३, कॉम्रेड शरद पाटील.

१७) भारतीय तत्त्वज्ञान व नास्तिक मत, कॉम्रेड शरद पाटील.

१८) पश्चिम भारतीय स्वायत्त आदिवासी राज्याची भूमिका, कॉम्रेड शरद पाटील.

१९) कॉम्रेड शरद पाटील यांच्या लेखांचा महासंग्रह राजकुमार घोगरे, श्रीमंत कोकाटे.

२०) भारतीय सौंदर्यशास्त्र, कॉम्रेड शरद पाटील.

२१) नामांतर औरंगाबाद आणि पुण्याचे, कॉम्रेड शरद पाटील.

संशोधक

भारत डिगांबर पवार
एम.ए. राज्यशास्त्र

मार्गदर्शक

प्रा.डॉ. फुके व्ही. एल.
सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शन,
श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी